# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913


अत्यंत महत्वाचे / कालमर्यादीत क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२६/2686

प्रति, दिनांक :- 30 SEP 2026

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती / यवतमाळ / वाशिम / खामगांव / मुर्तिजापुर.

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या बीबीए-बीसीए पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश गुणवत्ता यादी पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रियाबाबत.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे समन्वयक नियुक्ती आदेश क्र.विकाअ/शिक्षण/गु.या./२०२६/२६७६,दि.२९/०९/२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या विभागांतर्गत सोबत जोडलेल्या जिल्हा निहाय यादीतील शासकीय / अनुदानित, विनाअनुदानित संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या बीबीए-बीसीए पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास गुणवत्ता याद्यांची ऑफलाईन व ऑनलाईन तपासणी संदर्भीय पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे करावयाची आहे. प्रत्येक संस्थेकरीता तपासणी करण्याकरिता आपले संस्थेतील अधिका-यांची नियुक्ती करुन गुणवत्ता याद्या **दिनांक ०८/१०/२०२६ ते १२/१०/२०२६ पर्यंत** तपासुन व प्रलंबित त्रुटींची पुर्तता करण्याकरीता संबंधीत संस्थेला **दिनांक १६/१०/२०२६ ते १७/१०/२०२६ पर्यंत** वेळ देण्यात यावा. तदनंतर दिनांक १९/१०/२०२६ रोजी या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचवावे. तसेच सदर गुणवत्ता याद्यांची तपासणी करतांना काही अडचणी उद्‌भवल्यास विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

**सादर केलेल्या गुणवत्ता याद्या यांची संस्थेतर्फे गुणवत्ता याद्या संस्थास्तरावर समिती नेमूण प्रथम तपासणी संस्थास्तरावर झालेली असल्याबाबतचे प्राचार्याचे पत्र व संबंधित तपासणी अधिकारी यांचा अहवाल सोबत जोडणे आवश्यक आहे.**

तसेच तपासणी अधिकाऱ्यांची नियुक्ती आपल्या स्तरावर करुन, संबधीत तपासणी अधिकाऱ्यांना **Government of Maharashtra State Common Entrance Test Cell Acadamic Year 2026-27** मधील सबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची माहीती पुस्तिका मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे तपासणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश द्यावेत. तसेच पडताळणी करतांना खालील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थाकडुन प्रथम वर्षाकरीता मुदतठेवीचा हप्ता मा.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही, याची पडताळणी करावी. भरलेली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. मुदत ठेव पावती संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण म.रा., मुंबई यांच्या संयुक्त नावाने असल्याची खात्री करुन त्यासबंधी सर्बधित बँकेचे प्रमाणपत्र संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावे. तसेच सर्वच संस्थांनी मुदतठेव ठेवल्याबाबतची तपासणी करुन गुणवत्ता यादीसोबत जोडण्यास कळवावे.

तसेच आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता आपल्या संस्थेतील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी नमुद दिनांकास करण्यात यावी.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश शुल्क व विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारीत झालेले प्रवेश नियम/शासन निर्णय/अधिसुचना/न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी जबाबदार सबंधित संस्था राहील याची नोंद घ्यावी. सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव नजरचुकीने राहुन गेलेले असल्यास अश्या संस्थेस या कार्यालयाशी संपर्क साधावा.

१) प्रवेश यादी पडताळणीसाठी संस्थेच्या log in मध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करुन दिलेल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादीची Latest प्रिंट आऊट घेऊन ती पडताळणीसाठी सादर करावी.

२) प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करतांना सक्षम प्राधिकरणाची (AICTE) यांचे मान्यतेचे पत्र, शासन निर्णय, तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे अंतिम मान्यतेचे पत्र सबंधित विद्यापिठाचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे सलग्नता प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्राची प्रत तपासावी तसेच विद्यमान संस्थेने प्रथम वर्षाकरीता आवश्यक असलेली अनामत ठेव रक्कम (F.D.) सादर करणे आवश्यक आहे.

३) संस्थेस नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत आणि तदूनंतर संचालनालयाच्या अंतिम मान्यतेची प्रत इत्यादी कागदपत्रे जोडण्यात यावी.

४) नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (FD) भरणा केली असल्याची प्रत जोडावी. भरलेली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करण्यात येईल. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच प्रवेश क्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांनी नोंदणी शुल्क घेण्यात आले किंवा नाही याची पडताळणी करण्याकरीता नोंदणी शुल्क भरल्याची प्रत जोडावी.

५) संस्थास्तरावरील आणि केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरिता संबंधित संस्थेने संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त अर्जांची गुणवत्ता यादी, प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत याबाबत आवश्यक कागदपत्रे सादर करावी.

६) अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे तसेच संस्था स्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ते पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणी वेळी सादर करावी.

७) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश याद्या पडताळणी करतांना प्रवेशित उमेदवारांची संबंधीत अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने दिनांक ८/१०/२०२० असाधारण राजपत्र क्रमांक २३५, दिनांक २०/८/२०२१ असाधारण राजपत्र क्रमांक २३९ व दिनांक ३/८/२०२२ असाधारण राजपत्र क्रमांक २७३ अन्वये प्रसिध्द केलेली अर्हता तसेच पदवी अभ्यासक्रमाच्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केलेली अर्हता केवळ ग्राहय धरता येईल.

८) शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबदल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या कार्यालयास सादर करावा तसेच शुल्क परतावा व मुळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह सादर करावे.

**९) अल्पसंख्यांक दर्जाच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विभागाने प्रदान केलेल्या शासन निर्णय क्र.अविवि-२०१०/प्र.क.१०९/१०/कार्या-५,दिनांक -०१ जुर्ले २०१३ नुसार, अल्पसंख्याक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैद्य कालावधीची पडताळणी काटेकोरपणे करण्यात यावी.**

१०) महाराष्ट्र विना-अनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ दिनांक १७/८/२०१५ अस्तित्वात आला असून त्यामध्ये उशिरा प्रवेश / प्रवेशित उमेदवारांची माहिती उशिरा अपलोड करणे, मंजूर प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त प्रवेश करणे अशी प्रकरणे नियमित करण्याची तरतूद नाही, ही बाब विचारात घेता विहीत मुदतीनंतर केलेले किंवा राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर उशिरा अपलोड केलेले प्रवेश आणि मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त केलेले प्रवेश कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येणार नाही.

११) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश यादी विहीत दिनांकापर्यंत सादर करणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

१२) मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी पावती सादर करुन प्रवेश देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक तपासणी अधिकारी यांचे निदर्शनास आणावे.

१३) एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च वा मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार सदर प्रकरणीचे कागदपत्रे निदर्शनास आणावे.

१४) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे AISHE चे प्रमाणपत्र सादर करावे..

१५) एनएसपी पोर्टलवर प्राचार्य व इन्स्टिटयुट नोडल ऑफीसर यांचे KYC केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

**१६) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती (टि.सी. वगळता) विद्यार्थ्यांना नियमानुसार परत केल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र व त्याबाबतचा विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह अहवाल.**

**१७) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या शुल्काची विद्यार्थीनिहाय एकत्रित यादी (प्राचार्यांनी प्रमाणित केलेली प्रत )**

तसेच सोबत जोडलेल्या तपासणी वेळापत्रकाप्रमाणे आपल्या जिल्हयातील संस्थांना आपल्यास्तरावरुन तपासणी करण्यात यावी व वरील कालावधीत उपस्थित राहण्याबाबत संबंधीत संस्थांना आपल्यास्तरावरुन कळवावे.

**सोबत :- वेळापत्रकाची प्रत व संदर्भिय पत्राची प्रत.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- १.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

२.**प्राचार्य,** सर्व अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित बीबीए-बीसीए पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

त्यांना सुचित करण्यांत येते कि. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया तीन प्रतीत तयार करुन आपल्या जिल्हयातील शासकीय तंत्र निकेतनातील नियुक्त केलेल्या समन्वय अधिकारी, तपासणी अधिका-यांशी संपर्क साधुन ऑफलाईन व ऑनलाईन गुणवत्ता यादया तपासणीचे काम वरील **पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे व वेळापत्रानुसार दिलेल्या मुदतीच्या आत त्वरीत पूर्ण करुन घ्यावे.** सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रात योग्य ती माहिती प्रत्येक गुणवत्ता यादयासोबत जोडावयाची आहे. गुणवत्ता याद्या तयार करण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास तात्काळ या कार्यालयास संपर्क करावा. तसेच गुणवत्ता याद्यांची सोबतच्या वेळापत्रकानुसार तपासणी करुन घेण्याबाबत दक्षता घ्यावी. गुणवत्ता यादी तपासणीकरीता आवश्यक सर्व मुळ कागदपत्रासह आपल्या कार्यालयातील जाणकार प्राध्यापक / कर्मचारी यांना सबंधित संस्थेत प्रतिनियुक्त करावे. शासकीय संस्थाकडुन यादया तपासुन आल्यानंतर संस्थांनी या कार्यालयाशी संपर्क साधावा व या विभागीय कार्यालयाने प्रमाणित केलेली यादी प्रवेश नियामक प्राधिकरण यांना सादर करावयाची आहे. तेव्हा दिलेल्या मुदतीत या कार्यालयास उपरोक्त प्रमाणे तपासणी अधिका-याकडुन तपासुन सही शिक्यानिशी प्रमाणित करुन दिलेल्या मुदतीत गुणवत्ता याद्या या कार्यालयास सादर कराव्यात. याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्थेची राहिल, याची नोंद घ्यावी. **सोबत जोडलेल्या यादीमध्ये एखाद्या संस्थेचे नाव समाविष्ट नसल्यास तसे या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा.**

## गुणवत्ता याद्या तपासणी स्थळ :- संबंधीत जिल्हयातील शासकीय तंत्रनिकेतन
## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता प्रथम वर्ष बी.सी.ए. / बी.बी.ए. पदवी
## अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांची तपासणी करावयाच्या संस्थांची यादी व वेळापत्रक

| Sr No | Name of Institute | Course to be check | checking date |
|---|---|---|---|
| | **AKOLA District** | | Government Polytechnic, Murtizapur 08/10/2026 to -- 12/10/2026 Final Date for Verification to submit deficiency documents date 16/10/2026 to 17/10/2026 |
| 1 | 01314 - SMT RADHADEVI GOENKA COLLEGE FOR WOMEN Address:- MURTIZAPUR ROAD OPPOSITE NEHARU PARK AKOLA | BCA / BBA | |
| 2 | 01316 - SHANKARLAL KHANDELWAL ARTS SCIENCE AND COMMERCE COLLEGE Address:- GODBOLE PLOT OLD CITY DABKI ROAD AKOLA | BCA | |
| 3 | 01322 - SMT.MAHERBANU COLLEGE OF SCIENCE AND COMMERCE Address:- MAHATMA GANDHI ROAD, NEAR NEW ST STAND | BCA / BBA | |
| 4 | 01331 - ADARSH COLLEGE OF COMPUTER AND MANAGMENT Address:- JATHARPETH AKOLA | BCA / BBA | |
| 5 | 01336 - GAYADEVI JOSHI ARYABHATTA MAHAVIDYALAYA | BCA | |
| | **AMRAVATI District** | | Government Polytechnic, Amravati 08/10/2026 to -- 12/10/2026 Final Date for Verification to submit deficiency documents date 16/10/2026 to 17/10/2026 |
| 1 | 01102 - Vidya Bharati Mahavidyalaya Department of Research and PG Studies in Science & Management, Amravati | BCA/BBA | |
| 2 | 01111 - P.G. Department of Computer Science & Technology, D.C.P.E., H.V.P. Mandal, Amravati | BCA / BBA | |
| 3 | 01318 - SMT. KESHARBAI LAHOTI MAHAVIDYALAYA Address:- VIDYA NAGAR, MORSHI ROAD | BCA / BBA | |
| 4 | 01319 - MAHATMA JYOTIBA FULE MAHAVIDYALAYA AMRAVATI Address:- MAHATMA JYOTIBA FULE MAHAVIDYALAYA COLLEGE ROAD, PAVATI NAGAR | BCA | |
| 5 | 01321 - Swami Vivekananda College Of Management, Science and Arts, Warud. Address:- NEAR BUS STOP WARUD | BCA / BBA | |
| 6 | 01324 - SHRI SHIVAJI SCIENCE COLLEGE AMRAVATI Address:- SHIVAJI NAGAR, MORSHI ROAD, AMRAVATI | BCA / BBA | |
| 7 | 01327 - BRIJLAL BIYANI SCIENCE COLLEGE Address:- BIYANI EDUCATIONAL CAMPUS, DASERA MAIDAN ROAD, DURGA VIHAR CHOWK, AMRAVATI | BCA / BBA | |
| 8 | 01330 - BHARAT RATNA DR APJ ABDUL KALAM COLLEGE FOR UG AND PG COURSES WITH MILLENIUM SKILLS INNOVATION INCUBATION AND RESEARCH RAHATGAON AMRAVATI | BCA | |
| 9 | 01335 - SHRI BACCHUBHAU KADU BCA MAHAVIDYALAYA JARUD Address:- WARD NO. 3, WARUD AMRAVATI ROAD | BCA | |
| 10 | 01337 - LATE BABANRAO DESHMUKH MAHAVIDYALAYA Address:- NEAR BSNL TOWER WARDHA ROAD AMRAVATI | BCA/BBA | |
| 11 | 01340 - LATE NARAYANRAO AMRUTRAO DESHMUKH ARTS AND COMMERCE COLLEGE Address:- AT NANGLIYA NAGAR,CHANDUR BAZAR | BCA | |
| | **BULDHANA District** | | Government Polytechnic, Khamgaon 08/10/2026 to -- 12/10/2026 Final Date for Verification to submit deficiency documents date 16/10/2026 to 17/10/2026 |
| 1 | 1332 UTKARSH ART COMMERCE COLLEGE SINDKHED RAJA BULDHANA | BBA/BBA | |
| 2 | 01113 - Sadhana Shikshan Mandal, Saraswati College, Shegaon Address:- S.No.374/1, Gaulkheda Road, Shegaon Dist. Buldhana | BCA / BBA | |
| 3 | 01268 - Siddhivinayak Technical Campus, School of Engineering & Research Technology, Shirasgon, Nile Address:- Gat No.133,134 & 140, Shegaon Khamgaon Road, Shirasgaon, Nile, Tal. Shegaon | BCA | |
| 4 | 01320 - G S SCIENCE ARTS AND COMMERCE COLLEGE KHAMGAON Address:- NANDURA ROAD KHAMGAON 444303 | BCA | |
| 5 | 01325 - COLLEGE OF MANAGEMENT Address:- BEHIND ST ANNS SCHOOL SHEGAON ROAD KHAMGAON | BCA / BBA | |
| 6 | 01346- Shri Shivaji Science and Arts College Chikhli, Dist- Buldhana | BCA | |

| Sr No | Name of Institute | Course to be check | checking date |
|---|---|---|---|
| | **WASHIM District** | | **Government Polytechnic, Washim 08/10/2026 to -- 12/10/2026 Final Date for Verification to submit deficiency documents date 16/10/2026 to 17/10/2026** |
| 1 | 1333 SHRI KANIFNATH SCIENCE COLLEGE KARANJA KHERDA WASHIM | BBA/BCA | |
| 2 | 01313 - RAJASTHAN ARYAN ARTS SHRI MITHULALJI KACHOLIYA COMMERCE AND SHRI SATYANARAYAN RAMKRUSHANJI RATHI SCIENCE COLLEGE WASHIM | BCA | |
| 3 | 01317 - SWATANTRYA SAINIK SHRI KANHAIYALALJI RAMCHANDRA INNANI MAHAVIDYALAYA KARANJA LAD | BCA / BBA | |
| 4 | 01323 - MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE WASHIM | BCA | |
| | **YAVATMAL District** | | **Government Polytechnic, Yavatmal 08/10/2026 to -- 12/10/2026 Final Date for Verification to submit deficiency documents date 16/10/2026 to 17/10/2026** |
| 1 | 01106 - Hari Kishan Jaju Education Sanstha's,College of Management & Computer Science, Yavatmal | BCA / BBA | |
| 2 | 01315 - GOPIKABAI SITARAM GAWANDE MAHAVIDYALAYA UMARKHED | BCA / BBA | |
| 3 | 01326 - VIDYA BHAVAN COLLEGE OF MANAGEMENT AND RESEARCH, YAVATMAL | BCA / BBA | |
| 4 | 01339 - SUSHGANGA INSTITUTE OF MANAGEMENT Address:- NAIGAON POST - KONA, WANI | BCA / BBA | |

for i/c Joint Director
Technical Education
Amravati

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577 Website: www.jdroamt.org
Email: roamravati@dtemaharashtra.gov.in Fax No: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२६/
दिनांक :-

## :- प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,अमरावती यांचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ गु यादी/ २०२६/------------, दि.----------- तसेच प्राचार्य, ______________ ______________, ______________ यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक ______________ नुसार (संस्थेचे नांव)______________ या संस्थेच्या बीबीए-बीसीए या अभ्यासक्रमास पदवी अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता महाराष्ट्र शासनाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिया (CAP) / संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेऊन संस्थेकडे अर्ज व अर्जासोबत जोडलेली विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे सादर केली आहेत, त्या सर्व अर्ज व प्रमाणपत्रांची शासनाचे नियम व प्रवेश नियमावलीनुसार तपासणी करुन गुणवत्ता यादी तपासली आहे. ज्या उमेदवारांच्या बाबतीत त्रूटी आढळल्या त्यांचे बाबतीत सुस्पष्ट अभिप्राय सर्वसामान्य गुणवत्ता यादीत तथा स्वतंत्र त्रूटी पत्रावर नमूद केल्या आहेत. तसेच प्रवेश यादीत असलेल्या प्रत्येक उमेदवाराचे नांव गुणवत्ता यादीत असल्याची खात्री करुन घेतली आहे.

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website:** www.jdroamt.org

**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No:** (0721) 2577913


अत्यंत महत्वाचे

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /गु.या./२०२६/

दिनांक :-

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती

### प्रपत्र -

| संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | रिक्त जागा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी

शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी

नांव:-

पदनाम :

संस्था :

**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता बीबीए-बीसीए या पदवी अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता याद्यांसोबल सादर करावयाची व तपासणी अधिकाऱ्यांनी तपासावयाची कागदपत्रे.**

| अ.क्र | आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे | साक्षांकित छायांकित प्रत उपलब्ध आहे / नाही. | तपासणी अधिका-यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली,, शासन मान्यता, विद्यापिठाचे सलग्नीकरण यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही. | | |
| २ | संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे मान्यता पत्र आहे किंवा नाही, ते स्पष्टपणे नमुद करावे. | | |
| ३ | संस्थांनी नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्यायावत प्रयोगशाळा, ग्रथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत हमिपत्र सादर केले किंवा नाही. | | |
| ४ | संस्था स्तरावर प्रवेश फेरीकरीता वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याची प्रत जोडली किंवा नाही. | | |
| ५ | सांखिकी माहिती विहीत प्रपत्रात आहे किंवा नाही. | | |
| ६ | संस्थेत प्राचार्याचे नियमीत पद भरले आहेत किंवा नाही, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीबाबत तसेच इतर बाबतीत तक्रारी नाहीत याबाबत स्पष्टीकरण. | | |
| ७ | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्यात येते किंवा कसे याबाबतचे प्रमाणपत्र | | |
| ८ | रॅगिंग प्रतिबंधक समिती तसेच रंगींग प्रतिबंधकबाबत संस्थेतर्फे वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे काय.. | | |
| ९ | मागासवर्गीय उमेदवाराकडून शासन निर्णयाप्रमाणे/संचालनालयाच्या आदेशाप्रमाणे शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही केली किंवा कसे? | | |
| ११ | शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थानी वर्षाकरीता मुदतठेवीचा दुसरा हप्ता तसेच इतर मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई व संस्था अध्यक्ष यांचे संयुक्त ठेव खात्यात जमा केले किंवा नाही . | | |

प्राचार्यांची स्वाक्षरी
नांवः-
शिक्का

तपासणी अधिकारी स्वाक्षरी
नांवः-
पदनाम :
संस्था :